# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दुरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक: २/एनजीसी/मान्यता/२०१७/१४६

दिनांक : 03 FEB 2017

पहा : या संचालनालयाची अधिसूचना क्रमांक २(३)/एनजीसी/मान्यता/२०१७/४८,
दि. १२ जानेवारी, २०१७

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता नविन तंत्र शिक्षण संस्था सुरू करणे, नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, विद्यमान अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ यासाठी ऑन-लाईन पध्दतीने अर्ज करण्यास दि. ०४.०२.२०१७ पर्यंत सूचित केलेले आहे. त्याअनुषंगाने राज्यातील विद्यमान पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस सादर केलेल्या अर्जाची माहिती भरण्यासाठी या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्यास कळविण्यात आले आहे.

विद्यमान पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद / वास्तुकला परिषद / फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांना सादर केलेल्या खाली नमूद केलेल्या प्रस्तावांची तपासणी करण्यासाठी या संचालनालयातील समिती सभागृहात दि. ०७.०२.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली आहे.

- विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे.
- विद्यमान संस्थेतील सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ.
- आखाती देशातील ओसीआय / पीआयओ/ विदेशी / भारतीय कामगारांच्या मुलांकरीता नवीन जागा उपलब्ध करणे.
- अनिवासी भारतीयांच्या मुले / मुलींकरीता नवीन जागा उपलब्ध करणे.
- इंटीग्रेटेड / डयुअल डिग्री कोर्स

विद्यमान पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी वरील प्रस्तावांची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावरील माहिती भरल्यानंतर ॲप्लीकेशन पार्ट १, पार्ट २ व डेफीसिअन्सी रिपोर्ट हे दस्तावेज अपलोड करुन भलेलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करून दि. ०७.०२.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता तंत्र शिक्षण संचालनालय, समिती सभागृह, मुख्य कार्यालय, मुंबई येथे सुनावणीस उपस्थित रहावे. संबंधित संस्थानी वरील अर्जांच्या सुनावणीस येतांना खालील कागदपत्रांचे २ संच, तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद / वास्तुकला परिषद / फार्मसी कौंसिल ऑफ इंडीया यांना सादर केलेला प्रस्ताव व सदर प्रस्तावातील

माहितीच्या पृष्ठर्थची मुळ दस्तऐवज, सन २०१७-१८ च्या ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक मध्ये नमूद केलेल्या मानके व प्रमाणकांच्या पृष्ठर्थ आवश्यक त्या मुळ कागदपत्रासह सुनावणीस प्राचार्यांनी व्यक्तीशः उपस्थित रहावे.

१. संस्थेचा ठराव.

२. नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रीडीटेशन, नवी दिल्ली यांनी ॲक्रीडीटेशनास मान्यता दिलेल्या पत्राची साक्षांकीत प्रत

३. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विविध बाबींच्या मान्यतेसाठी शासनाने दि. २१.०८.२०१३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीची साक्षांकीत प्रत.

४. प्राचार्यांच्या नियुक्तीचे आदेश, नियुक्तीस विद्यापीठाची मान्यता व शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती.

५. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचा डेफीसिअन्सी रिपोर्ट (Submitted to R.O Office ]

६. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवर केलेल्या भाग १ व भाग २ च्या अर्जाची [submitted to R.O] साक्षांकीत प्रत

७. ऑन लाईन पध्दतीने संचालनालयाच्या संकेत स्थळी माहिती भरल्यानंतर ॲनेक्सर सी व डी ची साक्षांकीत प्रत.

८. जमीन, इमारत, ओसी. इ. बाबत सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

१) सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर त्यांना कळविण्यात येते की, या परिपत्रकातील सूचना आपल्या अधिपत्याखालील येणा-या संस्थाना आपले स्तरावरुन कळविण्यात याव्यात

२) सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित /खाजगी विनाअनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची महाविद्यालये

३) सिस्टीम मॅनेजर, कार्यासन क्रमांक ३ (संगणक कक्ष), तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई.

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/मान्यता/२०१७/ 326
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक- 4 FEB 2017

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

**प्रत :-**

१) प्राचार्य, सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, सोबतच्या परिपत्रकाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

H:\Kedare\2017\Approval Process 2017_18\Final NOTIFICATION 2017.Docx